of Closing
ती दिनांक

Date of Closing
समाप्ती दिनांक

दै. सकाळ दि. 31/05/2024

# घरफोडीतील सराईत गुन्हेगाराला अटक

## सीसीटीव्ही फुटेजवरून चोरट्याचा काढला माग



**नांदेड :** घरफोडीच्या घटनेतील सराईत गुन्हेगाराला विमानतळ ठाण्याच्या पोलिसांनी अटक केली.

**नांदेड, ता.३०** : आनंद नगरमधील एका घरफोडीच्या घटनेतील सराईत गुन्हेगाराला विमानतळ ठाण्याच्या पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून बारा पाण्याच्या मोटारी जप्त केल्या आहेत. दरम्यान, सीसीटीव्ही फुटेजवरून पोलिसांनी चोरट्याचा माग काढला. आकाश उर्फ भैय्या साईनाथ लंगडे (वय २०) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे.

आनंदनगर भागातील अजित जाधव बांधकाम चालू आहे. त्यांनी ५७ हजार रूपये किंमतीचे ईलेक्ट्रीशनचे साहित्य खरेदी करुन एका खोलीत ठेवुन त्यास कुलुप लावले होते. एक वॉचमेन देखील ठेवण्यात आला होता. परंतु ता.१९ रोजी रात्री १० ते ता.२० रोजी पहाटे दोन वाजेपर्यंत ड्युटी करुन घरी निघुन गेला. त्याच संधीचा फायदा घेवुन खोलीचे कुलूप तोडून आत ठेवलेले साहित्य घेवुन फरार झाला. यासंबंधी अजित जाधव यांचे मुनिम शिक्रप्पा ऊर्फ बाबाराव शिवशेट्टे यांच्या फिर्यादीवरून विमानतळ ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हे शोध पथकाचे जमादार दारासिंग राठोड बारकाईने तपास केला. आरोपीने चोरी करतानाचे फुटेज सिसिटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याचा पुरावा मिळून आला.

राठोड व पोलिस नाईक संतोष राणे यांनी संशयित आरोपी आकाश लंगडे हा असल्याचे तपासात निष्पन्न करुन त्याला अटक केली. त्याच्या घराची झडती घेतली. यात त्याने वेगवेगळ्या ठिकाणावरुन नळावर वापरावयाच्या १२ ईलेक्ट्रीकच्या मोटारी चोरलेल्या त्याच्या मिळून आल्या असून त्या जप्त केल्या आहेत. आरोपी हा सराईत गुन्हेगार आहे, असे पोलिसांनी सांगितले. पोलिस निरीक्षक जे.एन. मोगल, सहायक पोलिस निरीक्षक संतोष जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलिस हेड कॉन्स्टेबल दारासिंग राठोड, हे करीत असून त्यांच्या मदतीस पोलिस हेड कॉन्स्टेबल अफजल पठाण, शेख जावेद, किशन चिंतोरे, शेख सोयेब, राजेश माने, चालक पोलिस उपनिरीक्षक भोसीकर, चालक साईनाथ सोनसळे यांनी मदत केली आहे.

दै. दैनिक भास्कर

# चोर से 12 विद्युत मोटर, बिजली तारों के 8 बंडल सहित 57,000 की नकदी जब्त

जिला संवाददाता | नांदेड़



एयरपोर्ट पुलिस ने शहर के अलग-अलग हिस्सों में मकानों के निर्माण पर नजर रखकर इलेक्ट्रिक कारों के साथ बिजली सामग्री चुराने वाले को गिरफ्तार करने में सफलता हासिल की है। पुलिस ने चोर के पास से 12 विद्युत मोटर सहित फिनोलेक्स कंपनी के 8 बंडल तार कीमत कुल 57 हजार 500 रुपये जब्त किया है। ऑपरेशन को एयरपोर्ट पुलिस स्टेशन और अपराध जांच टीम ने संयुक्त रूप से अंजाम दिया।

आनंद नगर इलाके में रहने वाले अजीत रामचंद्र जाधव का आनंद नगर में एक प्लॉट है। वहां दो मंजिला मकान निर्माणाधीन है। उक्त निर्माण में लाइटिंग एवं प्लंबिंग, फर्नीचर का कार्य चल रहा है। इस काम के लिए उसने 57 हजार 500 रुपये का फिनोलेक्स कंपनी का बिजली का सामान, आठ बंडल तार और अन्य सामान खरीद कर एक बंद कमरे में रख दिया था। निगरानी के लिए एक चौकीदार नियुक्त किया गया। लेकिन 19 मई की रात चौकीदार के आधी रात में घर चले जाने का फायदा उठाकर चोर कमरे का ताला तोड़ कर कमरे में घुस गया। सीसी कैमरे में देखा गया कि उन्होंने फिनोलेक्स कंपनी के आठ बंडल तार व अन्य सामग्री चोरी कर ली और एक सफेद बैग लेकर फरार हो गये। सीसीटीवी कैमरे में कैद साक्ष्यों के आधार पर प्रभारी निरीक्षक जे.एन.मुगल के मार्गदर्शन में सपोनि संतोष जोंधले की टीम ने कार्रवाई की। आरोपियों की तलाश के लिए अभियान चलाया गया। प्राप्त सुरागों के आधार पर पुलिस ने ऐसे चोरों के तरीकों का अध्ययन किया और इस मामले में आकाश उर्फ भैया साईनाथ लंगड़े को पुलिस टीम ने आकाश के घर से गिरफ्तार कर लिया।